# सुचना

## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातंर्गत टेकू लावणे व धोकादायक भाग पाडणे या कामाकरिता सन २०२१-२४ या कालावधीकरिता नवीन ठेकेदारांची निवडसूची तयार करणे.

म्हाडा MHADA

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे (म्हाडाचा घटक ) मुंबईतील उपकरप्राप्त इमारतींना टेकू लावणे व धोकादायक भाग पाडणे या कामाकरिता सन २०२१-२४ या कालावधीकरिता नवीन ठेकेदाराची निवड सुची तयार करावयाची आहे. सदरहू नव्याने तयार करण्यात येणाऱ्या निवडसुचीत समाविष्ठ होऊ इच्छिणा-या ठेकेदाराकरीता ही जाहीरात प्रसिध्द करण्यात येत आहे. म्हाडा, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई महानगरपालिका यांचेकडील पंजीकृत व वरील कामाचा अनुभव असलेले ठेकेदार सदरहू सुचीच्या निवड प्रक्रियेत भाग घेऊ शकतात.

१. वर नमुद केल्यानुसार इच्छुक ठेकेदारांना को-या अर्जाच्या प्रती / माहिती पुस्तिका उपमुख्य अभियंता /परिमंडळ -२, ८९-९५, रजनी महल, ताडदेव, मुंबई-४०० ०३४, यांचे कार्यालयात ०४/०१/२०२१ ते ०२/०२/२०२१ या कालावधीमध्ये सकाळी ११.०० वा. ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत प्रत्येकी रु.१०००/- ( विनापरतावा ) या विक्री शुल्कात उपलब्ध होतील.

२. सिलबंद स्वाक्षांकित अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह व मुख्य लेखाधिकारी/ मुं.इ.दु. व पू.मंडळ यांचे नावे रु.२,००,०००/- ( रु. दोन लक्ष फक्त ) या रक्कमेच्या राष्ट्रीयकृत / शेडयूल्ड बँकेचा D.D. / F.D.R. (अनामत रक्कम) सह उपमुख्य अभियंता (परिमंडळ - २) यांचे कार्यालयात दिनांक ०३/०२/२०२१ दूपारी ३.०० वाजे पर्यंत स्विकारण्यात येतील.

३. कोणताही किंवा सर्व अर्ज रद्बातल करण्याचा अधिकार उपमुख्य अभियंता (परि -२) / मुं.इ.दु. व पू.मंडळ यांचे कडे राखीव राहिल. तसेच टेकू लावणे व धोकादायक भाग पाडणे या कामा करीता निवडसुची निश्चित करण्याचे अधिकार देखील उपमुख्य अभियंता (परि -२) / मुं.इ.दु. व पू.मंडळ यांचे कडे राखीव राहतील.

४. जाहीर करण्यात आलेल्या निवड सुचीची वैधता तीन वर्षांच्या कालावधीसाठी असून हया जाहीरातीस अनुसरुन अर्ज करुन पात्र ठरलेल्या ठेकेदाराने विहित करारनामा केल्यानंतरच त्यांचे नाव निवडसुची मध्ये समाविष्ठ करण्यात येईल.

५. निवड प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या ठेकेदारांचे मुंबई शहरामध्ये (A to G ward) स्वत:चे किंवा भाडयाचे गोडाऊन असावे व त्याची स्थळपाहणी व तपासणी (site visit ) उपमुख्य अभियंता (परिमंडळ-२) / मुं.इ.दु व पु.मंडळ हे निवड होण्यापूर्वी करतील. याबाबतची कागदपत्रे, करारनामे, मालकी इ. दर्शविणारी कागदपत्रे उपलब्ध करावीत.

६. निवडसूचीत समाविष्ठ करण्यात आलेल्या ठेकेदारास सक्षम प्राधिकाऱ्याने मंजुर केलेल्या दर सुची नुसार ( AT PAR BASIS ) काम करणे बंधनकारक राहील. सक्षम प्राधिकाऱ्याने मंजुर केलेली दर सूची माहिती पुस्तीकेमध्ये जोडण्यात आलेली आहे.

७. जाहिरातीस अनुसरून आलेल्या अर्जा नुसार टेकू लावणे व धोकादायक भाग पाडणे या कामा करीता नवीन सूची अमलात आल्यावर या कार्यालया तर्फे टेकू लावणे व धोकादायक भाग पाडणे कामासंदर्भात पूर्वी वितरीत करण्यात आलेली सर्व पंजीकरण प्रमाणपत्रे आपोआप रद्द बातल होतील.

८. सदयस्थितीत टेकू लावणे व धोकादायक भाग पाडणे (P & D ) यासाठी पंजीकृत असलेल्या सर्व ठेकेदारांना प्रस्तावित निवडसूची मध्ये समाविष्ठ होणे करिता नव्याने अर्ज करणे आवश्यक आहे.

९. माहिती पुस्तीकेमध्ये ठेकेदारांच्या नविन सूची संदर्भातील सर्व माहिती, अटी व शर्ती, अर्ज सादर करावयाची कार्य पध्दती, इत्यादी माहिती विस्तृतपणे दर्शविण्यात आलेली आहे.

सही /-

उपमुख्य अभियंता ( परिमंडळ -२)

मुं.इ.दु. व पू.मंडळ